(31)



आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

संपादक मंडल

मुख्य संपादक

प्रा.बहिरम देवेंद्र (हिंदी) डॉ. योगिता रांधवणे (मराठी)

सहायक संपादक

प्रा.नारायण हिरडे डॉ. राजेंद्र ठाकरे

डॉ. नीतिन थोरात प्रा. बापु देवकर

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vaidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors

# INDEX



| | | |
|---|---|---|
| 1. | संत चोखामेळा यांचे अभंग<br>प्रा.विजयकुमार रामदास घोडके, डॉ.राजेंद्र ठाकरे* | 10 |
| 2. | 'संत तुकारामांच्या अभंगातील पर्यावरण'<br>प्रा.डॉ.सुनील निगडे | 16 |
| 3. | मराठी संत साहित्यातील विविध विचार<br>प्रा. मोरे भास्कर निवृत्ती | 20 |
| 4. | कर्मयोगी संत गाडगेबाबा<br>सहा प्रा. दादा मच्छिंद्र समुद्र | 24 |
| 5. | "मराठी संत साहित्य परंपरा व स्वरुप"<br>प्रा. डॉ. बोडखे जी.पी. | 29 |
| 6. | मराठी जैन संत साहित्य<br>प्रा.डॉ. जगदीश आवटे, | 33 |
| 7. | संत साहित्य परंपरा व स्वरूप<br>डॉ. भास्कर निफाडे, | 36 |
| 8. | संत - चोखामेळा यांच्या अंभगातील आत्मनिवेदन<br>डॉ. योगिता मारुती रांधवणे | 39 |
| 9. | "समाज सुधारक : संत तुकाराम"<br>डॉ.अनिल गर्जे, गिऱ्हे ज्ञानदेव किसनदेव | 42 |
| 10. | मराठी संत साहित्यातील स्त्रीचित्रण<br>प्रा. जाधव विजय साहेबराव | 46 |
| 11. | समाज प्रबोधनकार : संत तुकाराम<br>प्रा. डॉ. जालिंदर कानडे | 49 |
| 12. | संत नाम देवांच्या अभंगातील नवविधा भक्तीचे स्वरुप<br>श्री लक्ष्मण कोठावळे | 52 |
| 13. | मराठी संत साहित्य विविध विचार<br>प्रा. दत्तात्रय सदाशिव सावंत | 56 |
| 14. | मराठी संत साहित्यातील भक्ती स्वरूप<br>प्रा. कल्पना तबाजी रोकडे | 60 |
| 15. | संत तुकारामांच्या काव्यातील समाजजीवन<br>श्री. नवनाथ केरू रक्टे | 69 |
| 16. | मराठीसंत साहित्यातील ज्ञानेश्वरांचे योगदान<br>प्रा. गोंटे मच्छिद्र रामचंद्र, डॉ.राजेंद्र ठाकरे* | 72 |
| 17. | ।। संत तुकारामांच्या अभंगातील बुवाबाजीचे चित्रण।।<br>प्रा.डॉ. सुभाष दिनकर आहेर | 77 |
| 18. | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ग्रामगीता<br>प्रा. सुधीर ब. मोरे | 82 |
| 19. | "मराठी संत कवयित्रींच्या अध्यात्मिक वाटचालीची परंपरा"<br>श्रीमती सुनिता आत्रे, | 86 |

16

# मराठीसंत साहित्यातील ज्ञानेश्वरांचे योगदान

प्रा. गोंटे मच्छिंद्र रामचंद्र

डॉ.राजेंद्र ठाकरे

मराठी संत हेच मध्ययुगीन महाराष्ट्राच्या सामाजिक अस्मितेचे व सांस्कृतिक ऐक्याचे खरे शिल्पकार होत.खिस्तोतर तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात चक्रधरांनी महानुभव पंथाची स्थापना करुन आणि ज्ञानेश्वरांनी वारकरी पंथाचा कायापालट घडवून आणून महाराष्ट्रात धार्मिक व सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवली. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीच्या श्रेयाचे मानकरी महानुभव चक्रधर आणि वारकरी ज्ञानेश्वर होत. महानुभव संप्रदाय कालांतराने निरनिराळया कारणांनी बहुजन समाजापासून दुरावत गेला. परंतु ज्ञानेश्वरांचा वारकरी संप्रदाय, भागवत धर्म त्यांनी सर्वसंग्राहक वृत्तीमुळे लोकप्रिय होत गेला. त्यात एकनाथ व तुकाराम आदी थोर संतमंडळी निर्माण झाली त्यांनी ज्ञानेश्वरांचा संदेश समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचविला ज्ञानेश्वरांनी वेदप्रामाण्याला धक्का लावला नाही. सामाजिक व्यवस्थेविरुध्द प्रखर बंड केले नाही. त्यांनी वर्णाश्रमधर्माच्या चौकटीत राहुनच धर्मक्षेत्रात स्त्री शुद्रादिकांना ईश्वरभक्तीचा हक्क प्राप्त करुन दिला. समतेचा पुरस्कार केला. अद्वैतनिष्ठेचा भक्कम आधार दिला. हया उदार धोरणामुळे भागवतधर्माच्या निशाणाखाली ब्राम्हणापासून शुद्रदिकांपर्यंत, स्त्रियांपर्यंत सर्व एकत्रित झाले.

वारकरी संप्रदायातील पहिलेच व सर्वश्रेष्ठ संत म्हणजे ज्ञानेश्वर (१२७५–१२९६) ज्ञानदेव, त्यांचे जीवन, वाङमय आणि व्यक्तिमत्व हे सारेच केवळ लोकोत्तर आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्ठी आणि अभंगवाणी या ग्रंथाची रचना केली हे त्यांचे ग्रंथ म्हणजे मराठी सारस्वताचे एक भूषणच आहे. निवृत्तीनाथांना ज्ञानदेवांनी गुरु केले आणि निवृत्तीनाथांच्या आज्ञेने ज्ञानेश्वरांच्या जिवितकार्याला आरंभ झाला. आपले कर्तव्य पार पाडून धर्माचे रहस्य अज्ञजनांना दाखविण्यासाठी त्यांनी या ग्रंथ रचना केल्या. मोठया खंबीरपणाने आणि निर्धाराने त्यांनी रुढ कल्पनांना धाब्यावर बसविले आणि पहिल्या प्रथमच त्यांनी संस्कृत मधून धर्मग्रंथ लिहीण्याची प्रथा मोडली. अमृताशी पैज मारुन मराठीची गोडी आणली. संस्कृत भाषेचा अडसर दूर केल्याने शास्त्रीय पंडिताच्या पहाऱ्यात अडकलेले ज्ञानभांडार सर्वासाठी मुक्त झाले आणि भगवतांची वाणी समाजाच्या कानाकोपऱ्यात उमटू लागली.

ज्ञानेश्वरी गीतेच्या १८ व्या अध्यायामधील ७०० श्लोकांचा मूळ अध्याय आणि क्रम न बदलता ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका ऊर्फ ज्ञानेश्वरी भगवतगीतेवरील टीका आहे. ओवीसंख्या सुमारे ९ हजार आहे. त्यांची रचना नेवासे येथे झाली. हा उल्लेख त्या ग्रंथातच आहे. तसेच तत्वज्ञानातील सिध्दांत ते उत्तम प्रकारे जाणतात आणि त्यांनी भाष्यकरांना वाटही पुसली आहे; पण

आपली टीका तर्ककर्कश होऊदिलेली नाही. ही टीका म्हणजे मराठी साहित्याचे एक अनमोल लेणे आहे. आपल्या सौदर्याने ती रसिकाला वेड लावते, नास्तिकालाही तिच्या रमणीयतचा वेध लागतो. यातील ओवी छोटी व नेटकी आहे, शब्दयोजना नेमकी व चातुर्यपुर्ण आहे, त्यामध्ये काव्य व तत्वज्ञान ही केवळ एकरुप ही केवळ एकरुप होऊन गेली आहेत. आध्यात्मातील सिध्दांतबाबत ज्ञानदेवांची वृत्ती अनाग्रही आहे. नाथपंथातील अद्वैत सिध्दांताचा व हठयोगातील कुंडलिनीजागृतीचा मोठा ठसा त्यांच्यावर आहे, पण त्यांची दृष्टी समन्वयाची आहे. ज्ञान आणि कर्म, कर्म आणि संन्यास, संन्यास आणि भक्ति, भक्ति आणि अद्वैत, अद्वैत आणि योग, योग आणि वेदान्त अशी अनेक द्वंद्वे तेथे निर्द्वद्वात पाहेचली आहेत. येथील तत्वज्ञान विचार जितका सुबोध तितकाच रमणीय आहे. तेथे अतींद्रीय अध्यात्मक साक्षात अनुभवाचे इंद्रियगोचर रुप धारण करुन उभे राहिले आहे आपली ही टीका शृंगाराच्या माथ्यावर पाय ठेवील हा आपला उदगार ज्ञानदेवांनी सार्थ करुन दाखवला आहे. त्यांचा हा ग्रंथ शांतरासाचा उत्कृष्ट अविष्कार आहे. यातील सरस प्रास्ताविके, उचित उपसंहार, वेधक शब्दचित्रे, समर्पक उपमादृष्टांत, मराठी भाषेविषयीचे प्रेम, गाढ तत्वज्ञानविचार, अद्वैतानुभावची प्रत्ययकारी वर्णने, विनय आणि आत्मविश्वास यांचे अधिक श्रेष्ठ मानावे याचा संभ्रम पडावा. अशी ही एक अनन्यसाधारण साहित्यकृती आहे. साहित्याचा हा तेजस्वी मानदंड मराठी सारस्वताच्या प्रारंभकालात उभा ठाकला आहे आणि पुढच्या काळातील अनेक श्रेष्ठ संतकवींनी याच्या प्रकाशात वाटचाल करण्यात धन्यता मानली आहे.

अद्वैताचा अनुभव हाच ज्याच एकमेव विषय आहे, तसा अमृतानुभव हा सुमारे ८०० ओव्यांचा स्वतंत्र ग्रंथ (हा अनुभवामृत हया नावानेही ओळखला जातो) आपले गुरु श्रीनिवृत्तिनाथ यांच्या आज्ञेने ज्ञानदेवांनी आपल्या गीताटीकेनंतर लिहिला. काव्य आणि तत्वज्ञान या दोन्ही दृष्टींनी हा 'ज्ञानेश्वरी'च्याही वरची पातळी गाठतो असा रसिकांचा व तत्ववेत्यांचा अभिप्राय आहे. योगी चांगदेवानी कोरे पत्र पाठवले, त्याला उत्तर देण्याच्या निमित्ताने पासष्ट ओव्यांचे एक अद्वैतानुभुतीपर काव्य ज्ञानदेवांनी लिहिले, ते चांगदेवपासष्टी म्हणून प्रसिध्द आहे. अथांग आकाशाचे छोटेसे प्रतिबिंब एखादया जलाशयात पडलेले दिसावे व त्याचा आपल्या मनाला त्या बिंबरुप आकाशाहूनही अधिक मोह पडावा, तशी या 'चांगदेवपासष्ठी'तील अविष्काराची गुणवत्ता आहे. विठ्ठल संप्रदायाशी संपर्क आल्यावर ज्ञानदेवांनी अभंग लिहले असावेत. त्यांच्या नावावरील बऱ्याच अभंगाचे कर्तृत्व संशयित आहे. तथापि काही अभंगातून ज्ञानदेवांच्या अनुभवाची उत्कटता व रचनेची कोवळिक आढळते. योगपर व आत्मनुभवर अभंग, गौळणी अणि विरण्या यांत ते विशेषत्वाने जाणवते. त्यातील हरिपाठाचे अभंग हा छोटा गट वारकऱ्यांच्या नित्य पाठात आहे. एवढी अलौकिक रचना ज्ञानदेवांनी केवळ एकविसाव्या—बाविसाव्या वर्षाच्या आयुष्यात केली हा देखील एक चमत्कारच. जगाच्या वाङमयातही असे उदाहरण अपवादानेच असावे. वारकरी संप्रदायात ज्ञानदेवांना माऊली मानतात. 'ज्ञानेश्वरी' हा त्या पंथाचा जणू धर्मग्रंथच आहे. 'ज्ञानदेवे रचिला पाया' या शब्दांमध्ये त्यांच भागवत धर्मातील कार्य वर्णिले जाते. मराठी साहित्याच्या संदर्भातही ते उद्गार सार्थ आहेत.

चतुर्विध भूमिका: तत्वज्ञ, योगी, संत व साहित्यिक अशी त्यांची चतुर्विध भूमिका होती. तत्वज्ञाची विवेकपरता, योग्याची निरामयता, संताची भूतदया व साहित्यिकाची सौंदर्यदृष्टी हे गुण त्यांच्या ठिकाणी एकवटले होते. स्त्रीशूद्रांच्या धर्मजीवनात डोळसपणा आणून त्यांच्या दैनंदिन

व्यवहाराला नैतिक अधिष्ठान प्राप्त करुन देण्याची त्यांची इच्छा होती, म्हणून नामसंकिर्तनासारख्या सोप्या साधनाचा प्रसार करतानाही त्यांनी अध्यात्माचे अनुसंधान कायम राखले. त्यांच्या भक्तिसंप्रदायाला तत्वचर्चेचे वावडे नव्हते. उलट सर्व वारकरी संतांनी अंधश्रध्देवर वारंवार आघात केले आहेत; अज्ञानमूलक उपासनेचा निषेधच केला आहे. ज्ञानाची मक्तेदारी एका विशिष्ट वर्गाकडे न राहता सगळया समाजाला त्याचा फायदा मिळावा म्हणून ज्ञानेश्वरांनी वेदांताची गहन तत्वे सामान्य जनांच्या भाषेत सांगितली. मात्र जुन्या पंडिताप्रमाणे शब्दज्ञानातच गुरुफटून न जाता आत्मप्रचितीच्या द्वारे रहस्य समजून घेण्याची त्यांनी लोंकाना शिकवण दिली. त्यांच्या विचारसरणीत संन्यासवादाला व समाजपराङमुखतेला बिलकुल आत्मप्रचितीच्या द्वारे रहस्य समजून घेण्याची त्यांनी लोकांना शिकवण दिली. त्यांच्या विचारसरणीत संन्यासवादाला व समाजपराङमुखतेला बिलकुल स्थान नाही. भक्तीइतकेच नीतीचे व आत्मप्राप्तीइतकेच लोकसंग्रहाचे त्यांना महत्व वाटत होते. म्हणूनच त्यांच्या परंपरेतील वारकरी भक्त मोक्षप्राप्तीसाठी घरदार सोडून रानात गेले नाहीत.

प्रतिकूल परिस्थितीशी कर्तव्यबुध्दीने झगडत राहून त्यांनी आपली प्रगती करुन घेतली व लोकांना त्यांची दृष्टी केवळ स्वत:च्या जीवनावर केंद्रीत न होता समाजाच्या उन्नतीचा मार्ग शोधीत होती. लौकिक जीवनातील विषमता नाहीशी करुन शुद्राची सामाजिक प्रतिष्ठा व त्यांच्या राहणीचे मान वाढविणे हाती नव्हते. कारण बाहय परिस्थिती अनुकुल असल्याशिवाय नुसत्या विचारप्रवर्तनाने अशी समाजकांती कधीच घडून येत नाही, म्हणून सामाजिक प्रश्नांच्या वाटेस न जाता वारकरी संतांनी फक्त धार्मिक क्षेत्राकडेच आपली दृष्टी वळवली आणि समतेच्या व बंधुभावाच्या तत्वांचा पाठपुरावा करुन सामाजिक विषमतेची धार पुष्कळच कमी केली. सामाजिक प्रतिष्ठेपेक्षा तसेच लौकिक, मानमान्यतेपेक्षा वैयक्तिक चारित्र्य नि:संशय श्रेष्ठ आहे. अध्यात्मनिष्ठ मानवतावादाचा नुसता प्रचार करुन ते स्वस्थ बसले नाहीत; तर प्रत्यक्ष व्यवहारात आपल्या तत्वांना चिकटून राहण्याचे मनोधैर्य त्यांनी दाखविले.

ज्ञानेश्वरांचे कार्य:-- ज्ञानेश्वरांनी स्वत:च्या जीवनावरुन स्त्री शुद्रांदीची सामाजिक कुचंबणा, तत्कालीन धर्मकलनांचा कठोर पगडा आणि त्यातील उथळपणा, हया साऱ्याची कल्पना आली होती. पांडित्यामध्ये आणि परंपरा यांच्यात रुतलेला सनातन वर्णाश्रमधर्म पददलित, बहुजन समाजाला आत्मोन्नतीचा मार्ग दाखवू शकणार नाही याची जणू त्यांची खात्रीच पटली होती. त्यांच्या घराण्यातील विठ्ठल भक्तीच्या परंपरेमुळे त्यांच्यावर औदार्य, समता,विश्वबंधुत्व यांचे संस्कार झाले होते याचे नाथ संप्रदायाने त्यांना काश्मिरी शैवमतातील अद्वैदानंद वैभव दिले होते. योगसाधना, हरिहरैक्य, दलितोध्दार व लोकभांषाचा स्विकार या गोष्टींचा सुध्दा वारसा त्यांना नाथसंप्रदायाने दिला होता. समाजातील असंख्य पददलित, स्त्री शुद्रांचा आत्मोन्नतीचा प्रश्न त्यांचापुढे होता. त्यामुळेच भक्तीमार्गाच्या प्रसारातून या समाजाचा आत्मोन्नतीचा मार्ग खुला करण्याची जणू त्यांना प्रेरणा मिळालेली असावी. त्या काळातील धर्म साधनेचे विकृत भ्रष्ट रुप, इस्लामी आक्रमणाचा धोका या गोष्टी लक्षात घेऊन त्यांनी जून्यातूनच नवं घडवलं, धर्म देव कल्पनेचे शुध्दीकरण, सर्व समाजाला कर्मयोगप्रधान असलेला भक्तीविचार सांगणे, अध्यात्म आणि लौकिक जीवन यातील असलेला विरोध नाहीसा करणे आणि शेवटी लौकिक जीवनालाच धर्माचे आणि नितीचे अधिष्ठान प्राप्त करुन देणे हे करतानाच सर्व समाजाला आत्मोध्दाराचा मार्ग खुला

करुन वर्णाश्रमधर्माचा कठोर नियमांचा जाचकपणा, तीव्रपणा कमी करणे हे समिश्र कार्य ज्ञानेश्वरांनी आपले ध्येय मानले.

ज्ञानेश्वरांनी अद्वैत भक्तीचा प्रसार केलेला आहे. ज्ञानेश्वरीच्या १४ व्या अध्यायात मी कोण आहे? भक्ती म्हणजे काय? अन्यभिचारी भक्ती कशी असते? असे तीन प्रश्न आणि त्यांचा उहापोह केलेला आहे. देवतेच्या स्वरुपाबददलचे अज्ञान विकृती परसविते, म्हणून परमात्म्याचे वास्तव रुप जाणून घेतले पाहिजे. परमात्मा हा नाम रुप, देश, काल, आकार यांच्या अतीत असून सर्व विश्व हे त्याचेच व्यक्त रुप होय. अशा व्यापक भूमिकेचा स्विकार करुन ज्ञानेश्वर क्षुद्र देवदेवता, त्यांच्या विकृत उपासना यांचा निषेध केलेला दिसतो " तैसे विश्व एणें नावें। हें मी चि पै आघवे।।" ही ज्ञानेश्वरांची भूमिका आहे. त्यांच्या तत्वविचारांचा पाया आहे. परमात्मा हा एकदेशीय नाही, विश्वाचा पलिकडेही तो कोठे नाही तर तो विश्वरुपाने प्रकटत असतो अशा या विधात्मक परमात्म्याची भक्ती ज्ञानेश्वरांनी लोकांना शिकविली.

" जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत।
हा भक्तियोग निश्चित। जाण माझा।।"

येथे भक्तासाठी कोणत्याही क्रियाकर्माची आवश्यकता नाही हे ज्ञानेश्वरांनी स्पष्ट केले ज्ञानी भक्ताची सहजासहजी होणारी आचार क्रिया हीच भक्ती सर्वत्र अद्वैत दिसल्यावर क्रियारुप साधना सुध्दा करत नाही.

"तैसी क्रिया कीर न साहे। तऱ्ही अद्वैती भक्ति आहे।
अनुभवाचि जोगे नव्हे। बोला ऐसे।।"

ज्ञानेश्वरांनी कर्मकांडापासून अलिप्त अशा अद्वैतभक्तीचा पुरस्कार करुन तत्कालीन धर्मभावना यात बदल घडवून आणला. आपल्या अद्वैत तत्व ज्ञानाच्या आधारे मानवतावाद त्यांनी समाज मानसात रुजवला. विश्व हे परमात्मयाचाच अविष्कार आहे. हा चितविलासवाद प्रतिपादन केला. तसेच जनतेने उपासना संप्रदायांचा, साधनमार्गाचा समन्वय घडवणे हे ज्ञानेश्वरांचे कार्य होय.

ज्ञानेश्वरांचे साहित्यविषयक विचार :— ज्ञानेश्वरांनी आपला काव्यानुभव आपल्या समोरचा श्रोतृवर्ग, आपली पूर्वपरंपरा या साऱ्याची प्रखर जाणीव आहे आपल्याला काय सांगायचे याचे पूर्ण भान त्यांना आहे अतिंद्रीय असे परमतत्व ते इंद्रियाकडून भोगवणार आहेत. बुध्दीवर भावाचा फुलोरा निर्माण करुन ते परमतत्वाचे निरुपण करणार आहेत. त्यांना 'ज्ञानवितो' निरुपावयाचा आहे. 'ज्ञानाचे बोलणे' करावयाचे आहे, 'बोली अरुपाचे रुप' दाखवायचे आहे 'जे शब्दातीत स्वभावे' अशा तत्वाचे आकलन करुन द्यावयाचे आहे आणि हे सारे त्यांनी मोठया आत्मविश्वासाने केले त्याचवेळी त्यांनी काव्यातील शब्दशक्तिविषयी काव्याच्या अभिव्यक्तीविषयी वेळोवेळी आपले विचार व्यक्त केले शिवाय आपल्या शांतरसात्मक काव्याचा आस्वाद कसा घ्यावा हे त्यांनी आवर्जून सांगितले. हया आस्वादासाठी रसिकाचे चित्त कशा प्रकारचे असावे.याविषयी

"दिसो परतत्व गेलां। पाहो सुखाचा सोहळा।
रिधो महाबोध सुकाळा। माजी विश्व।।"

तसेच, त्यांचा साहित्याविषयीचा त्यांचा दृष्टीकोन पुढीलप्रमाणे,

"वाचे बरवे कवित्व। कवित्व बरवे रसिकत्व।
रसिकाची परतत्व। र्स्पशु जैसा।"

वास्तविक पाहता साहित्यविषयक सिध्दांताची चर्चा करण्यासाठी ज्ञानेश्वरीचा जन्म नाही. तरीही ज्ञानेश्वरांनी आपले काव्यविषयक विचार, साहित्य शास्त्र विषयक दृष्टीकोन स्वच्छेने मांडतात ते जाणवले. परतत्व स्पर्श घडणे अनुभवणे व घडविणे म्हणजे खरा साहित्यानंद, काव्यानंद त्यांची ठाम भूमिका आहे.

ज्ञानेश्वरांनी मध्ययुगीन महाराष्ट्रामध्ये भागवत धर्माचा संप्रदाय सुरु करुन ज्ञानेश्वरांनी एका नव्या युगाचा प्रारंभ केला. भारतीय संस्कृतीच्या इतिहासात भारतीय साधनेला महत्वपूर्ण स्थान आहे. दीनदलितांच्या आत्मिक उत्थानाची कळकळ, आत्मनुभुतीचे विवेकनिष्ठ प्रामाण्य, भक्तीने परमात्म्याची परिसिमा गाठणारी अद्वैतदृष्टी, जनमाणसामध्ये अनुबंध निर्माण करणाऱ्या लोकभाषेचा वापर या सर्व वैशिष्ट्यांचे प्रदर्शन प्रथम श्री ज्ञानेश्वरांनी केले.म्हणूनच वारकरी पंथाच्या मंदीराचे वर्णन करताना बहिणाबाईने म्हटले आहे.

"ज्ञानदेव रचिला पाया। रचियेला देवालया।।"

तुकाराम ज्या मंदीराचा कळस झाला त्या भागवतधर्माच्या मंदिराची पायाभरणी ज्ञानदेवांनी केली ज्ञानदेवांच्या या अमोघ कर्तत्वाची महत्तता तत्कालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विजेसारखी डोळयात भरते. कोणत्याही महापुरुषाचे कर्तृत्व हे त्याच्या स्थलकालाच्या अनुरोधानेच ठरत असते. त्यातूनच त्याला विशिष्ट गती आणि दिशा प्राप्त होते त्यांचे कार्य असे स्थलकाल सापेक्ष असले तरीही त्यात स्थलकालाच्या मर्यादेने ते सीमीत ज्ञानेश्वरांचे व्यक्तिमत्व आकाराला आलेले दिसते. मराठी भाषेचा सन्मान ज्ञानेश्वरीच्या रुपाने उंचावलेला आहे.

**संदर्भ.**


१. बहिरट भा. प. वारकरी संप्रदाय, उद्‌गम आणि विकास.
२. गोसावी र.रा.संपादक — सकाळ संतगाथा खंड ११९.
३. सुखवणकर बा. र. महाराष्ट्रातील संत मंडळाचे एतिहासिक कार्य.
४. सहस्त्रबुध्दे अनिल,' ज्ञानेश्वरीतील साहित्य विचार', मॉडर्न बुक डेपो पुणे,.१९९६
५. यादव आनंद,'मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती', मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे.
६. राजाध्यक्षाविजया','मराठी वाङ:मयकोश, खंड चौथा समीथा संज्ञा, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई प्रथमावृत्ती नोव्हेंबर २००२.
७. पवार गो. मा. व हातकणंगलेकर', मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप',पॉप्युलर प्रकाशन पुणे १९८६.
८. ढेरे. रा. चि. विविधा पुणे १९६६.
९. कुलकर्णी श्री.रा. साहित्य सेतू, मुंबई १९९८